भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
पाणी पुरवठा विभाग

**विषय:- सन २०२२-२३ या वर्षाकरीता प्रभाग समिती क्र.१ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणेच्या ई-निविदेतील कमी दराला प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ २६.५ चौ.कि.मि. आहे. मनपाचे कार्यक्षेत्रात ५ प्रभाग समिती निहाय पाणी पुरवठयाचे दैनंदिन कामकाज चालते. प्रभाग समिती निहाय अस्तित्वात असलेल्या बोअरवेल किरकोळ दुरुस्तीकरीता नादुरुस्त होत असतात. सद्या उन्हाळयाचे दिवस सुरु झालेले आहेत. उन्हाळयामध्ये नागरिकांना पाणी पुरवठा करीता मनपा पदाधिकारी, नागरिक यांच्या बोअरवेल दुरुस्ती करीता भ्रमणध्वनीवरुन तक्रारी प्राप्त होतात. सदर तक्रारीचे वेळच्या वेळी तातडीने निवारण करावे लागते. सद्याचे कामकाज वार्षिक ठेका पध्दतीने ठेकेदरामार्फत करुन घेतले जातात.

सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता भिवंडी नि. श. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय बोअरवेल निगा व दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणे कामी ४ महिन्याकरीता रु.२७,७१,४८१/- मात्रची ई-निविदा सुचना क्र.३८ दि.२०/०९/२०२२ ते ०७/१०/२०२२ या कालावधीत मनपाच्या महाटेंडर व हिंदुस्तान टाईम्स , नवभारत व नवराष्ट्र या राज्यस्तरीय वृत्तपत्रात पसिध्द करण्यांत आली होती. दिनांक ११/१०/२०२२ रोजी ई-निविदा निविदा समिती समोर उघडली असता एकूण ५ निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्ती करीता मजूर सेवा पुरविणे बाबत.** | **रु.२७,५७,६२५/-** |

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

सदर कामा करीता मे. बरकत कन्स्ट्रक्शन यांचे निविदेतील दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १० टक्के जास्त असल्यामुळे ठेकेदार यांना निविदेतील दर कमी करणे करीता दिनांक १०/११/२०२२ रोजी वाटाघाटी करीता बोलविण्यांत आले असता वाटाघाटी झालेल्या बैठकीच्या अंती मे. बरकत कन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी दराने म्हणजेच रु. २७,५७,६२५/- मात्र प्रमाणे काम करण्यांस समंती दर्शविलेली असुन तसे पत्र मनपाकडे दिलेले आहे. मे. बरकत कन्स्ट्रक्शन यांना सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र.१ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्ती करणे करीता मजूर सेवा पुरविणेबाबतच्या ई निविदेतील दरांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकीय ठराव क्र.** 82 **दिनांक :-** 15 / 9 **/२०२३**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाकरीता प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा व दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र.१ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणेच्या निविदेतील दरांना मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
पाणी पुरवठा विभाग

**विषय :- सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणेच्या ईनिविदेतील कमी दराला प्रशासकीय मंजूर मिळणेबाबत.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ २६.५ चौ.कि.मि.आहे. मनपाचे कार्यक्षेत्रात पाच प्रभाग समिती निहाय पाणी पुरवठयाचे दैनंदिन कामकाज चालते. प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन किरकोळ दुरुस्तीकरीता नादुरुस्त होत असतान, सद्या उन्हाळयाचे दिवस सुरु झालेले आहेत. उन्हाळयामध्ये नागरीकांना पाणी पुरवठा करीता मनपा पदाधिकारी यांच्या पाईप लाईन दुरुस्ती करीता भ्रमणध्वनीवरून तक्रारी प्राप्त होतात. सदर तक्रारीचे वेळच्या वेळी तातडीने निवारण करावे लागते.सद्याचे कामकाज वार्षिक ठेका पध्दतीने ठेकेदारामार्फत करुन घेतले जाते.

सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता भिवंडी नि. श. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणे का मी ४ महिन्याकरीता रुपये ३८,६८,०८३/- मात्रची ई निविदा सुचना क्र. ३९ दि.२०/०९/२०२२ ते दि.०४/१०/२०२२ या कालावधीत मनपाच्या महाटेंडर व महाराष्ट्र सम्राट या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यांत आली होती, दि.०७/१०/२०२२ रोजी ई निविदा,निविदा समिती समोर उघडली असता एकुण ४ निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणेबाबत ई निविदेतील कमी दराला प्रशासकीय मंजूर मिळणेबाबत.** | **रु.३८,४८,७४८/-** |

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

सदर कामाकरीता मे बरकत कन्स्ट्रक्शन यांचे निविदेतील दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १० टक्के जास्त असल्यामूळे ठेकेदार यांना निविदेतील दर कमी करणेकरीता दिनांक २१/१०/२०२२ रोजी वाटाघाटी करीता बोलविण्यांत आले असता वाटाघाटीत झालेल्या बैठकीच्या अंती मे बरकत कन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५० टक्के कमी दराने म्हणजेच रुपये ३८,४८,७४८/- मात्र प्रमाणे काम करण्यांत समंती दर्शविलेली असून तसे पत्र मनपाकडे दिलेले आहे. मे बरकत कन्स्ट्रक्शन यांना सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्ती करणे बाबत मजूर सेवा पुरविणेबाबतच्या ई निविदेतील दरांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव.

**ठराव क्रमांक :** ८१ **दिनांक :** १८ / १ / **२०२३**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाकरीता प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात पाईप लाईन निगा व दुरुस्तीकामी मजूर सेवा पुरविणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. . एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणेच्या निविदेतील दरांना मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**